# के. वाय. सी. नॉर्म्सची पूर्तता करणेबाबत आवाहन

बँकेच्या सर्व खातेदारांना माहित आहेच की रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशाप्रमाणे जुन्या व नविन सर्व खातेदारांनी के. वाय. सी. नॉर्मसची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व खातेदारांना या आवाहनाद्वारे नम्र विनंती करण्यात येत आहे की, आपण आपले ज्या शाखेत खाते आहे त्या शाखेतील कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून आपल्या खात्यावर असलेल्या अपूर्ततांची पूर्तता करुन द्यावी.

*** ओळखपत्रासाठी स्वीकृत करण्यायोग्य कागदपत्रे**

| | |
|---|---|
| 1) पासपोर्ट | 2) मतदार ओळखपत्र |
| 3) पॅनकार्ड | 4) सरकारी/सैनिकी सेवा ओळखपत्र |
| 5) ड्रायव्हिंग लायसन्स | 6) सेवानिवृत्त वेतन आदेश सेवानिवृत्त कर्मचारी केंद्र सरकार/राज्य सरकार विभाग लोक उपक्रम |
| 7) टपाल कार्यालयाद्वारे निर्गमित फोटो ओळखपत्र | 8) विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त (यु.जी.सी.) विद्यापीठ किंवा/अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेद्वारा (ए.आय.सी.टी.ई.) निर्गमित फोटो ओळखपत्र |
| 9) आधारकार्ड | |

*** निवासस्थान पत्ता ओळखण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

1) क्रेडिट कार्ड विवरण – तीन महिन्यापेक्षा अधिक जुने नसावे.
2) वेतन पर्ची
3) उत्पन्न/संपत्ती कर निर्धारण आदेश (असेसमेंट)
4) विज बील – तीन महिन्यापेक्षा अधिक जुने नसावे.
5) दूरध्वनी बील – तीन महिन्यापेक्षा अधिक जुने नसावे.
6) शिधापत्रिका (रेशनकार्ड)
7) मतदार ओळखपत्र
8) सरकारी विभागाद्वारे, लोक उपक्रमाद्वारे ज्यामध्ये सध्याचा पत्ता नोंदविलेला असेल अशा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निर्गमित वेतन भुगतान आदेश (पी.पी.ओ.)
9) पंजीकृत भाडेपट्टा करारनामा/विक्रीपत्रक यांस पत्ता ओळखीसाठी स्वीकारले जाईल.

वरील प्रत्येक सूचीपैकी एक कागदपत्र ओळखीसाठी व निवासस्थान पत्ता तपासण्यासाठी सादर करण्यात यावे व सध्या काढलेले आपले साईजचे दोन फोटो सोबत आणावे. वरील पूर्तता न झाल्यास आपल्या खात्यावरील व्यवहार नाईलाजाने थांबवावे लागतील.

## सभासद व ग्राहकांना आवाहन

- ⇨ **सभासदांनी आपली लाभांश जमा होणारी खाती व अन्य खात्यांवर व्यवहार होत नसल्यास त्यावर त्वरित व्यवहार सुरु करावेत. अन्यथा त्यावर चार्जेस टाकण्यात येतील.**
- ⇨ **कॅश क्रेडिट खातेधारकांनी दरमहा नियमितपणे स्टॉक स्टेटमेंट आणून द्यावीत. त्याचबरोबर आपल्या कॅश क्रेडिट खात्याचे नुतनीकरण वेळच्या वेळी होईल याची दक्षता घ्यावी.**
- ⇨ **आपला पत्ता बदललेला असल्यास कृपया नविन पत्त्याच्या पुराव्यासह नजिकच्या शाखेत अथवा शेअर्स विभागाशी संपर्क साधावा.**